महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग ,शासन निर्णय क्रमांक सीसीटी- ३६२६ / प्र. क्र. १४९ / ई-१७३१६०८ / पोल- ३, दि.०४/०९/२०२६

**विषय:-** सीसीटीएनएस प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांच्या मुदतवाढीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक सीसीटी- ३६२६/ प्र.क्र. १४९ / ई-१७३१६०८ पोल-३,दि.०४/०९/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९०४१६१३०३४८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Anita Pitambar Rathod
Date: 08-09-2026
18:39:21

( अनिता राठोड )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १७

प्रत,
विशेष पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

सीसीटीएनएस प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांच्या
मुदतवाढीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६२६/प्र.क्र.१४९/ई-१७३१६०८/पोल-३, मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०००३२.
### दिनांक : ०४ सप्टेंबर, २०२६

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांकः- एमआयएस ०५०८/७४८/प्र. क्र.३२९/पोल-४. दि.२२.०५.२००९.
२) महाराष्ट्र शासन आणि मे. विप्रो लि. यांचे दरम्यान दि.२२.०३.२०१२ रोजी झालेला करारनामा.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील SEC (State Empowered Committee) समितीच्या दि.४.७.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दि.१२.०७.२०१६ व दि.२८.१२.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१७.०१.२०१७, दि.२०.०७.२०२०, दि. १८.५.२०२१, दि.१६.११.२०२१, दि. १०.५.२०२२, दि. ४.११.२०२२, दि.१२.७.२०२३, दि. २१.९.२०२३ व दि. २९.१.२०२५, दि. १२.१.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
७) शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटीएनएस ३६१५/प्र.क्र. २०२/ भाग-३/ पोल-३, दि.१.७.२०२२ व दि.२१.७.२०२३. दि.८.१.२०२४. दि.१२.१२.२०२४, दि.
८) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-५/पोल-३, दि.२९.८.२०२३.
९) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४ / २०१४-O/O Directorate of IT-DIT (MH), दि. ५.१०.२०२३
१०) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि.९.५.२०२२ व दि.१३.१.२०२३. व दि.२९.८.२०२३, दि. ३०.१.२०२५, दि. १६.७.२०२५.
११) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-६/पोल-३, दि.१२.१२.२०२४.
१२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९५/ई-१११६६१६/पोल-३, दि.२.६.२०२५.
१३) अपर पोलीस महासंचालक (गुन्हे अन्वेषण विभाग) पुणे यांचे मे. डेलॉईट कंपनीला दिलेले क्र.० No.: CID/SCRB/ CCTNS / ९०२/२०२३, Pune दि.८.११.२०२३ चे कार्यादेश.
१४) विशेष पोलीस महानिरीक्षक (नि.व स.) पोलीस महासंचालक कार्यालय, यांचे पत्र क्र. पोमसं/१७/६१६२/ सीसीटीएनएस प्रकल्प-सल्लागार /ई-५५/२०२६, दि. २३.६.२०२६ चे पत्र.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन २०१५ मध्ये राज्यातील १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरिष्ठ पोलीस कार्यालय CAS (Core Application Software) सॉफ्टवेअरव्दारे जोडण्यात आले असून सदर कार्यालयांमध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे दि.१५.०९.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते लोकार्पण पार पडले आहे. सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जोडण्यात आलेल्या १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरीष्ठ कार्यालयामध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्प हा केंद्र पुरस्कृत होता

परंतु मार्च २०१८ नंतर या प्रकल्पास केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणार नाही, असे केंद्र शासनाने कळविले आहे. सबब सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींकरीता येणारा खर्च राज्य शासनामार्फत करणे आवश्यक आहे. त्यानुसार सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि. १२.१.२०२६ रोजीच्या बैठकीत सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. सदर बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दि.९.३.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे पाठविण्यात येऊन प्रशासकीय मान्यतेच्याबाबतचे सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.२३.६.२०२६ रोजीच्या पत्रांद्वारे पुढीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत-

**प्रकल्प सल्लागार पीडब्ल्युसी कं. यांना दि. १.११.२०२५ ते ३०.६.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देणे:-**

दि.१२.१.२०२६ रोजीच्या SAC बैठकीत १ सिनियर कन्सल्टंट व २ दोन कन्स्टल्टंट असे तीन सल्लागारांना दिनांक १.११.२०२५ ते दिनांक ३०.६.२०२६ अखेर मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि. १.४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासनाच्या विविध विभागांमध्ये आयटी सल्लागार नियुक्ती संदर्भात मर्यादा निश्चित केल्या आहेत. त्यानुसार दि. ५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये २ पेक्षा अधिक सल्लागार नियुक्त केले असतील त्यांनी अशा अतिरिक्त सल्लागारांच्या सेवा दि. ३०.४.२०२६ पर्यंतच चालू ठेवाव्यात व दि. १.५.२०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत संबंधित विभाग कार्यालयात २ पेक्षा जास्त आयटी सल्लागार कार्यरत राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी असे सूचित केले आहे. यास अनुलक्षून अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.७.५.२०२६ रोजी घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत सीसीटीएनएस प्रकल्पासाठी १ सल्लागार नियुक्तीचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये "सीसीटीएनएस प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार मे.पीडब्ल्युसी कं. यांना दि.१.११.२०२५ ते ३०.०४.२०२६ या कालावधीकरिता ३ रिसोर्स साठी (१ वरिष्ठ सल्लागार व २ सल्लागार) यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात यावी, तद्नंतर अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ७.५.२०२६ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सीसीटीएनएस प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार मे.पीडब्ल्युसी कं. यांच्या एका सल्लागारास दि.१.५.२०२६ ते ३०.६.२०२६ या कालावधीकरिता नियुक्तीस मान्यता देण्याची बाब विचाराधिन होती. त्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## <u>शासन निर्णय</u> :

सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२.१.२०२६ रोजी झालेल्या राज्य शिखर समिती (State Apex Committee) च्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने तसेच अ.मु.स.(गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.७.५.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांनुसार पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे-

**(क) मे.पीडब्ल्युसी कं. यांना दि.१.११.२०२५ ते ३०.०४.२०२६ या कालावधीकरिता ३ रिसोर्स साठी (१ वरिष्ठ सल्लागार व २ सल्लागार) यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.**

तद्नंतर अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ७.५.२०२६ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सीसीटीएनएस प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार **मे.पीडब्ल्युसी कं. यांच्या एका सल्लागारास दि.१.५.२०२६ ते ३०.६.२०२६ या कालावधीकरिता नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.**

२. सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींसाठी येणारा खर्च “मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त निधी कोषागारातून आहरण करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रण अधिकारी” व त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे. उपरोक्त निधी सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या कामासाठी केंद्र शासनाच्या निदेशानुसार खर्च करण्यात यावा व खर्च करण्यात आलेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. प्रकल्प पुरवठादारांसदर्भात सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७(अ), नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार आणि प्रकल्प सल्लागाराच्या संदर्भात शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार, मधील अनुक्रमांक ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५ अनुसार व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शिखर समितीच्या (SAC) दिनांक १२.१.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांनुसार तसेच अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.७.५.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०४१६१३०३४८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

NAGNATH RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by NAGNATH RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=13C3ACFAE7FC8126CE285621D58425C075E0F60C5F67596D7F7181EA8CC9011E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43D41039958F4FA2CBAEB247FAE932CC6267D47DE282ACE9AEFCEA0F0CAC955E, cn=NAGNATH RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.09.04 16:14:00 +05'30'

**(नागनाथ जाधव)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि व स), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१७. प्रकल्प संचालक, मे. डेलॉईट प्रा.लि., मुंबई.
१८. प्रकल्प संचालक, मे. पीडब्ल्यूसी कंपनी, मुंबई.
१९. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
२०. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
२१. निवडनस्ती, पोल-३.